आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

७ ऑगस्ट २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाला राज्य मंत्रिमंडळाची मान्यता, पावणे चार लाख हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार / अल्पसंख्यकांच्या उन्नतीसाठी मार्टी स्थापन करण्याचा निर्णय

- कोणताही पक्ष छोटा, मोठा न मानता महाविकास आघाडी म्हणून विधानसभा निवडणुकीला सामोरे जाण्याची काँग्रेसची भूमिका /मुख्यमंत्रीपदाचा निर्णय निवडणुकीनंतर

- राज्यात राज्यसभेच्या दोन जागांच्या पोटनिवडणुकीसाठी ३ सप्टेंबरला मतदान

- शेअर बाजारातली घसरण थांबली, सेन्सेक्समध्ये ८७५, तर निफ्टीत ३०५ अंकांची वाढ

**आणि**

- पॅरीस ऑलिम्पिकमधे, वजन अधिक भरल्यानं भारताची पैलवान विनेश फोगाट अंतिम सामन्यासाठी अपात्र, भारताकडून निषेध

**<><><><><>**

राज्यातल्या अल्पसंख्यंकांच्या उन्नती करता टार्टी, बार्टी, महाज्योतीच्या धरतीवर मार्टी अर्थात अल्पसंख्यांक संशोधन आणि प्रशिक्षण संस्था स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय आज राज्य सरकारच्या मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला. या संस्थेसाठी एकूण ११ पदं निर्माण केली जातील. तसंच  ६ कोटी २५ लाख रुपये प्रशासनिक खर्चासाठीही मंत्रीमंडळानं मान्यता दिली आहे.

शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर सिंचन करण्यासाठी. महत्वाकांक्षी वैनगंगा - नळगंगा नदीजोड प्रकल्पाला राज्य मंत्रिमंडळानं आज मान्यता दिली. यामुळे पावणे चार लाख हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे.

आदिवासी भागातल्या प्राथमिक शिक्षकांना शिक्षण पात्रता परिक्षा उत्तीर्ण होण्यासाठी दोन वर्षांची मुदत वाढ देण्याचाही निर्णय घेण्यात आला. अनुसुचित जाती जमातीच्या जात, वैधता प्रमाणपत्र मिळण्यातल्या अडचणी दूर करण्यासाठी अधिनियमात सुधारणा करण्याचा निर्णयही राज्य सरकारनं घेतला आहे. विविध प्रकल्पांमुळे बेघर झालेल्या प्रकल्प बाधितांना घरं देण्यासाठी विविध नियमांमध्ये बदल करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णयही यावेळी घेण्यात आला.

**<><><><><>**

महाविकास आघाडीत कोणताही पक्ष ‘छोटा भाऊ, मोठा भाऊ’ नाही, महाविकास आघाडी म्हणूनच विधानसभा निवडणुकीला सामोरे जाणार असून मुख्यमंत्रीपदाचा निर्णय निवडणुकीनंतर होईल, असं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज सांगितलं.

विधानसभा निवडणुकीसंदर्भात काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांची बैठक आज मुंबईत गांधीभवनात झाली. त्यानंतर पटोले बातमीदारांशी बोलत होते.

आजच्या बैठकीत जागा वाटपावर प्राथमिक चर्चा झाली, तसंच राज्यातल्या विविध मुद्द्यांवर चर्चा झाल्याचं त्यांनी सांगितलं. जागा वाटपाचा निर्णय गुणवत्तेनुसारच होणार आहे, असं ते म्हणाले. विधानसभा निवडणुकीच्या जाहिरनाम्याची जबाबदारी पृथ्वीराज चव्हाण यांच्याकडे दिली आहे, ते समाजातल्या विविध घटकांशी चर्चा करून सर्वसमावेशक जाहीरनामा तयार करतील, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

देशात ९ राज्यातल्या राज्यसभेच्या १२ जागांवर होणाऱ्या पोटनिवडणुकीसाठी निवडणूक आयोगानं आज अधिसुचना जारी केली. महाराष्ट्रात खासदार उदयनराजे भोसले आणि पियुष गोयल लोकसभेवर निवडून गेल्यामुळे दोन जागांवर पोटनिवडणूक होणार आहे. या सर्व जागांसाठी या महिन्याच्या १४ तारखेला निवडणुकीसाठीची अधिसूचना जारी केली जाणार आहे. या महिन्याच्याच २२ तारखेला अर्जांची छाननी होईल. तसंच २६ आणि २७ तारखेपर्यंत अर्ज मागे घेतले जातील आणि ३ सप्टेंबरला मतदान होईल.

**<><><><><>**

करासंबंधीचे कायदे आणि प्रक्रियांचं सुलभीकरण करून त्याद्वारे देशाची प्रगती आणि रोजगारनिर्मितीला चालना देण्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सरकारचा दृष्टिकोन असल्याची ग्वाही अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज दिली. अर्थ विधेयक २०२४वरच्या चर्चेला त्यांनी लोकसभेत उत्तर दिलं. सरकारनं गेल्या दशकात कर प्रशासनात अमूलाग्र बदल केले आहेत. करांमध्ये भरमसाठ वाढ न करता यात सुलभीकरण आणलं आहे. यामुळे पारदर्शकता वाढली आहे, असंही त्या म्हणाल्या. मध्यमवर्गावरचं कराचं ओझं वाढल्याचे दावे त्यांनी फेटाळून लावले. गेल्या दोन वर्षांत मध्यमवर्गाला मोठा दिलासा देण्यात आल्याचं त्या म्हणाल्या.

**<><><><><>**

राज्य परिवहन महामंडळ कामगार संघटनाच्या कृती समितीची बैठक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबईत झाली. समितीच्या मागण्यांच्या अनुषंगाने बैठक घेऊन उच्चाधिकार समितीनं याचा अहवाल आठवडाभरात सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. महामंडळाचं उत्पन्न वाढावं यासाठी दोन हजार नवीन बसगाड्या घेण्याबाबत सरकार सकारात्मक असल्याचंही त्यांनी सांगितलं.

महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन द्यावं, मागच्या वेतन वाढीतला फरक दूर करावा, महागाई भत्त्याची थकबाकीची रक्कम द्यावी आदी मागण्यांसंदर्भात या बैठकीत चर्चा झाली. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजित पवारही उपस्थित होते.

<><><><><>

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने अंतर्गत प्रशिक्षणार्थींना विद्यावेतन देण्यात येणार आहे. १२ वी उत्तीर्ण प्रशिक्षणार्थींना ६ हजार, आयटीआय किंवा पदविका उत्तीर्ण असणाऱ्यांना ८ हजार तर पदवीधर किंवा पदव्युत्तर प्रशिक्षणार्थींना १० हजार विद्यावेतन देण्यात येणार आहे. हे प्रशिक्षण सहा महिन्यांसाठी असेल.

पालघर जिल्ह्यातल्या उमेदवारासांठी १२ ऑगस्ट रोजी पालघर जिल्हा कौशल्य विकास रोजगार आणि उद्योजकता मार्गदर्शन केंद्राकडून प्लेसमेंट ड्राईव्हचं आयोजन करण्यात आलं आहे.

उमेदवारांना https://mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

<><><><><>

शेअर बाजारात गेल्या ३ दिवसांच्या पडझडी नंतर आज वाढ पहायला मिळाली. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आज दिवसअखेर ८७५ अंकांची वाढ नोंदवत, ७९ हजार ४६८ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३०५ अंकांची वाढ नोंदवत २४ हजार २९८ अंकांवर बंद झाला. या वाढीचा तेल, वायू , धातू आणि ऊर्जा क्षेत्रातल्या कंपन्यांना मोठा फायदा झाला.

<><><><><>

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताला मोठा धक्का बसला आहे. भारताची पैलवान विनेश फोगाट हिला ऑलिम्पिकमधून अपात्र ठरवण्यात आलं आहे. अंतिम

फेरीच्या आधी तिचं वजन काही ग्रॅमनं अधिक भरल्यानं तिच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळं विनेशला अंतिम फेरीचा सामना खेळता येणार नाही आणि तिला पदकही दिलं जाणार नाही.

**<><><><>**

भारतीय ऑलिम्पिक संघटनेनं भारताची पैलवान विनेश फोगाट हिला पॅरिस ऑलिम्पिकमधून अपात्र ठरवण्याच्या निर्णयाचा निषेध संयुक्त जागतिक ऑलिम्पिक संघटनेकडे नोंदवल्याची माहिती क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांनी आज लोकसभेत दिली. केंद्र सरकार महिला पैलवानांना सर्व प्रकारची मदत देत असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वतः या मुद्द्याबद्दल भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्ष पी. टी. उषा यांच्याशी चर्चा केली असल्याचं त्यांनी निवेदनात सांगितलं. या परिस्थितीत आपल्याकडे काय पर्याय आहेत, याची चाचपणी करण्याची सूचना संघटनेला दिल्याचंही त्यांनी नमूद केलं.

दरम्यान, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी विनेश फोगाटनं आत्तापर्यंत पॅरिस ऑलिम्पिकमध्ये केलेल्या कामाचं कौतुक केलं. देशाला तिचा अभिमान असल्याचं त्यांनी समाज माध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं. तिला अपात्र ठरवल्यामुळे संपूर्ण देश निराश आहे, पण तरीही सर्व देशवासीयांसाठी ती चॅम्पियन असल्याचं मूर्मू यांनी नमूद केलं. गृहमंत्री अमित शहा यांनीही विनेश फोगाटला अपात्र ठरवण्याच्या निर्णयाबद्दल निराशा व्यक्त केली. यामुळे कोट्यवधी भारतीयांना धक्का बसल्याचं त्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये नमूद केलं.

**<><><><>**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आजच महिलांच्या १०० मीटर अडथळ्यांच्या शर्यतीत ज्योती याराजी हिनं सातवं स्थान मिळवून पुढच्या फेरीत प्रवेश केला. कुस्तीत महिलांच्या ५३ किलो वजनी अंतिम पंघलला तुर्किएच्या प्रतिस्पर्ध्याकडून

१०-० असा पराभव पत्करावा लागला. महिलांच्या टेबल टेनिस सांघिक उपांत्यपूर्व फेरीत जर्मनीनं भारताचा ३-१ असा पाडाव केला. भालाफेक स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्थान मिळवण्यात अन्नू राणी हिला अपयश आलं. मॅरेथॉन रेस वॉक मिश्र रिले स्पर्धेत सूरज पन्वर आणि प्रियांका गोस्वामी या दोघांनाही स्पर्धा पूर्ण करता आली नाही.

**<><><><><>**

**नाशिक** जिल्ह्यात चार दिवस झालेल्या पावसामुळे जिल्ह्यातली सहा धरणं भरली आहेत तर आणखी सहा धरणांमध्ये ८० टक्क्यापेक्षा अधिक जलसाठा झाला आहे. मराठवाड्यातल्या जायकवाडी धरणासाठी नाशिक जिल्ह्यातून आतापर्यंत पंधरा टीएमसी पाणी सोडल्याचं जलसंपदा विभागानं सांगितलं. गेल्या २४ तासात पावसाने विश्रांती घेतली आहे पेठ, सुरगाणा, इगतपुरी आणि त्र्यंबकेश्वर परिसरात सुद्धा सध्या पाऊस थांबला आहे. पावसामुळे धरणातला पाणीसाठा वाढला असून गंगापूर, भावली, वालदेवी, नांदूरमध्यमेश्वर, हरणबारी आणि केळझर या धरणामध्ये अद्यापही विसर्ग सुरू आहे. याशिवाय त्रंबकेश्वर, सुरगाणा, इगतपुरी, पेठ, दिंडोरी तसंच कळवणमध्ये अतिवृष्टीची नोंद करण्यात आली आहे. त्रंबकेश्वर मध्ये सलग तीन दिवस शंभर मिलिमीटरहून अधिक पाऊस झाल्याचं जलसंपदा विभागाच्या सूत्रांनी सांगितलं.

**रत्नागिरी** जिल्ह्याला संपूर्ण जुलै महिन्यात अक्षरशः झोडपून काढलेल्या पावसाचा जोर गेल्या आठवड्यात कमी झाला होता; मात्र आज दिवसभर पावसाच्या सरी कोसळत आहेत. रत्नागिरी तालुक्यासह शहर परिसर, तसंच संगमेश्वर तालुक्यातल्या साखरपा, देवरुख आदी भागांमध्ये आणि लांजा तालुक्यातही चांगला पाऊस झाला. खेड तालुक्यातली जगबुडी नदी सध्या इशारा

पातळीवर असून, आज सकाळपर्यंतच्या आकडेवारीनुसार जिल्ह्यात वार्षिक सरासरीच्या ९४ टक्के पाऊस झाला आहे.

**<><><><><>**

राज्यात काल **कोकण आणि विदर्भात** बऱ्याच ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडलं.

राज्यात येत्या २४ तासात कोकण, **मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात** तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे. कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी  तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल, असं वेधशाळेनं वर्तवलं आहे. **विदर्भात** तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचा अंदाजही  वर्तवण्यात आला आहे.

**//<><><><><>//**